क्र.साप्रवि/रवका/न.क्र.६१७/

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

# प्रशासकीय परिपत्रक क्र.४९ दिनांक १९/०५/२००६

विषय : कामावर असताना अपघात झालेल्या कर्मचाऱ्यांस वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मंजूर करण्याचे अधिकार क्षेत्रीय कार्यालयातील अधिकाऱ्यांना प्रदान करणेबाबत.

संदर्भ : १) स.स्था.आ.क्र.३७७ दि.३०.८.१९५८ चे सुधारपत्र क्र.८ दि.२५.५.१९७७
२) सा.आ.क्र.२० (क)दि.१७.६.१९६३ ला निर्गमित केलेले सुधारपत्र क्र.४३ दि.९.९.१९८०

.....

स.स्था.आ.क्र.३७७ दि.३०.८.१९५८ चे सुधारपत्र क्र.१२ दि.१८.२.९८ अन्वये, कर्मचाऱ्यास कामावर असताना अपघात झाल्यास त्यावर तात्काळ उपचार सुरु करता यावेत म्हणून तात्पुरती अग्रिम रक्कम मंजूर करण्याचे अधिकार क्षेत्रीय कार्यालयातील अधिका-यांना प्रदान करण्यात आले आहेत. मात्र वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मंजूर करण्याचे अधिकार सा.आ.क्र.२० (क) दि.१७.६.१९६३ चे सुधारपत्र क्र.४३ दि.९.९.१९८० अनुसार मुख्य कार्यालयाच्या कक्षेत आहेत. वैद्यकिय खर्चाची प्रतिपूर्तीची मंजुरी क्षेत्रीय कार्यालयातील संबंधित कर्मचाऱ्यांना तातडीने मिळावी यासाठी, मुख्य कार्यालयात केंद्रित असलेले अधिकार क्षेत्रीय कार्यालयातील अधिकाऱ्यांना प्रदान करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन होता.

२. त्यास अनुसरुन कामावर असताना अपघात झालेल्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत उपचारासाठी झालेल्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या सा.आ.क्र.२० (क) दि.१७.६.१९६३ चे सुधारपत्र क्र.४३ दि.९.९.१९८० मध्ये ५ (ड) १ व २ नुसार अंतर्भूत असलेले मंजुरीचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक (म.रा.वी.वितरण कं.मर्या.) यांनी, संचालक (संचलन) व संचालक (वित्त) यांच्याशी विचार विनिमय करुन खालीलप्रमाणे सुधारित करण्यास मान्यता दिली आहे.

| अ.क्र. | कामावर असताना अपघात झाल्यास वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मंजूर करण्यासाठीची रक्कम | सुधारित अधिकार प्रदानानुसार सक्षम अधिकारी |
|---|---|---|
| १. | रु.२०,०००/- किंवा त्यापेक्षा कमी रकमेची प्रकरणे | संबंधित मंडलाचे अधीक्षक अभियंता - प्रशासकीय अधिकारी व लेखा अधिकारी यांचेशी विचार विनिमय करुन. |
| २. | रु.२०,००१ ते ३०,०००/- पर्यंतच्या रकमेची प्रकरणे | संबंधित परिमंडळाचे मुख्य अभियंता - उप मुख्य लेखा अधिकारी व आस्थापना अधिकारी यांचेशी विचार विनिमय करुन. |
| ३. | रु.३०,००१/- व त्यापेक्षा अधिक रकमेची प्रकरणे | सबंधित कार्यकारी संचालक / संचालक (संचलन) / संचालक (वित्त)/ संचालक (मनुष्य बळ) |

३. स.स्था.आदेश क्र.३७७ दि.३०.८.१९९८ चे सुधारपत्र क्र.८ दि.२५.५.१९७७ आणि स.सा.आ.क्र.२० (क) दि.१७.६.१९६३ चे सुधारपत्र क्र.४३ दि.९.९.१९८० मध्ये तदनुषंगिक बदल होईल.

४. स.स्था.आदेश क्र.३७७ चे सुधारपत्र क्र.१२ दि.१२.२.१९९८ मधील, अपघात झालेल्या कर्मचाऱ्याला वैद्यकीय उपचारासाठी मंजूर करावयाच्या अग्रिम रकमेबाबतच्या तरतुदी अबाधित रहातील.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक त्वरित अंमलात येईल आणि ते महावितरण कंपनीच्या कर्मचा-यांसाठी लागू राहील.

(सु. य. पाटील)
**मुख्य महाव्यवस्थापक (क)**

प्रति,
कार्यकारी अभियंता तत्सम व त्यावरील दर्जाचे अधिकारी यांना
म.रा.वीज वितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे.

*K/Circular – Medical*